# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील सहकारनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ३१/०८/२०१७

सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे अतीष रमेश आरडे, वय २० वर्षे, रा. स.नं. ६५ उभा गणपतीजवळ, तळजाई वसाहत, पद्मावती पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ३९/२०१७ दिनांक ३१/०८/२०१७ रोजी दोन वर्षा करीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम खून करण्याचा प्रयत्न, दुखात, हमला करण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण करणे, नुकसान करणे, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करणे, जिवे मारण्याची धमकी देणे, जबर दुखापत करणे, सामाई इरादा, घातक हत्याराने जबर दुखापत करणे, बेकायदेशिर जमावात सामील होणे, दंगा करणे, प्राणघातक शस्त्रानिशी दंगा करणे,जखमी करणे, इतरांचे जीवित किंवा व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने दुखापत पोहचविणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द सहकारनगर पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रवीण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.